नळ पाणी पुरवठा योजनेच्या सुधारीत अंदाजपत्रक व आराखडयांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करणे
वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-२

---

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : ग्रापापु-१०९६/प्र.क्र.१२५९/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : १९ मे, १९९८.**

**पहावे :-**

शासन निर्णय वित्त विभाग,क्र. विपप्र-१०९२/प्र.क्र. ११३/९२/विनियम,दिनांक १.६.१९९२.

**प्रस्तावना :-**

संदर्भातील वित्त विभागाच्या दि. १.६.१९९२ च्या आदेशातील तरतूदीनुसार योजनेस, प्रस्तावाच्या मूळ उद्दीष्ठात बदल अपेक्षित नसेल व अटी/शर्ती त्याच कायम असल्यास अशा योजनांना मूळ खर्चाच्या १५ टक्के अथवा रु. ५ लाख यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या मर्यादेपर्यत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभाग म्हणून पाणी पूरवठा व स्वच्छता विभागास देण्यात आलेले आहेत. मात्र यापेक्षा जास्त खर्चाचे अधिक्य असेल तर प्रस्तावास व्यय अग्रक्रम समितीची मान्यता घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे प्रस्तावातील ज्या योजना या विभागाच्या अधिकार कक्षेत येत नाहीत त्यांना व्यय अग्रक्रम समितीची मान्यता घ्यावी लागते व त्यास मान्यता मिळण्यास विलंब लागतो. त्यामुळे शासनाने केलेल्या दृढ संकल्पानुसार पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी कालबध्द कार्यक्रमानुसार विहीत कालमर्यादेमध्ये होणे अवघड होऊन बसते. यास्तव सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अधिकार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास काही प्रमाणात मर्यादा वाढवून प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंबंधात शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :-**

वर प्रस्तावनेत नमूद केलेल्या पार्श्वभूमीवर ज्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे परंतु या ना त्या कारणामुळे सदर योजनांना पुन्हा सुधारित प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक ठरते त्या योजनांच्या बाबतीत खालीलप्रमाणे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अधिकार हे खालील अटींच्या अधीन राहून पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास प्रदान करण्यात येत आहे.

१) सुधारित योजनेमध्ये मूळ योजनेप्रमाणे अटी व शर्ती कायम असल्यास आणि केवळ दरसूचीतील बदलामुळे सुधारित मंजूरी द्यावयाची आहे.

२) सुधारित योजनेची किंमत मूळ योजनेच्या किंमतीच्या १५ टक्केपेक्षा जास्त झाल्यास अशा प्रस्तावास नेहमीप्रमाणे व्यय अग्रक्रम समितीची मान्यता घेण्यात यावी.

३) वर परिच्छेद १ मधील अटीच्या अधिन राहून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार क्षेत्रिय अधिकारी यांना सोबतच्या विविरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे प्रदान करण्यात येत आहेत.

प्रस्तावित आदेश हे वित्त विभागाच्या अनौपचारीक संमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २५२/९८, विनियम, दिनांक १३.५.९८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(सु. ल. तिडके)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे स्वीय सहाय्यक.
२. विभागीय मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
७. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , मुंबई.
९. वित्त विभाग, विनियम, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व अधिकारी व कार्यासने.

## परिशिष्ट

शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १०९६/सीआर १२५९/पापु-०७ दिनांक १९ मे, १९९८ सोबतचे परिशिष्ट

वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग दुसरा पाणी पुरवठा व स्वच्छता या विभागाला/कार्यालयाला महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका १९७७ अंतर्गत नियमांखाली प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार

| अ.क्रं | नियम क्रमांक | शक्तीचे वर्णन | अधिकारांचा वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी | प्रदान केलेल्या अधिकारांची मर्यादा | अटी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ६. | २७ अ | अगोदर प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. अशा योजनांना/प्रस्तावांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे | **स्थानिक क्षेत्र**<br>अ) जिल्हा परिषद | मूळ अंदाजित किंमतीच्या १५ टक्के इतक्या मर्यादेपर्यंत | १) मूळ मंजूर अंदाजापेक्षा अधिक रक्कम खर्च व्हावयाच्या आत सुधारित प्रशासकीय खर्चास मान्यता घेण्यात यावी.<br>२) मूळ प्रस्तावाला लागू असलेल्या इतर सर्व अटी तशाच चालू राहतील.<br>३) सुधारित प्रशासकीय योजनेत/प्रस्तावाच्या मूळ उद्देशात बदल करण्यात येऊ नये<br>४) जेथे सुधारित अंदाजित किंमत १५ टक्क्यांनी अधिक असेल तर व्यय अग्रक्रम समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>५) जिल्हा पाणी पुरवठा समितीची शिफारस असणे आवश्यक आहे.<br>६) केवळ दर सूचीतील वाढी मुळेच किंमत वाढलेली असावी.<br>७) योजनेची सुधारित किंमत ही मूळ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याकरिता सक्षम अधिकाऱ्यांना जी वित्तीय मर्यादा विहीत करुन दिली आहे त्या मर्यादेपर्यंतच असावी. |
| | | | राज्यस्तर<br>अ) कार्यकारी अभियंता | ----"------ | |
| | | | ब) जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता | ----"------ | |
| | | | क) मुख्य अभियंता | ----"------ | |
| | | | ड) प्रशासकीय विभाग | ----"------ | |